# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**महोदय/महोदया,**

महाराष्ट्र शासनाने अल्पसंख्यांक प्रवर्गातील विद्यार्थीनींकरिता सर्व सोयींनी युक्त असे अद्ययावत मुलींकरीताचे वसतिगृह राजाराम महाविद्यालयाच्या परिसरात सुरू करण्यात आले असून याबाबतचे अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह, कोल्हापूर यांचे संदर्भ क्र.आस्था/अल्पसं/२०१९-२०२०/४५४ दि. १४/०६/२०१९ रोजीचे पत्र माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

कळावे,

सोबत- वरीलप्रमाणे

कळावे,

आदेशान्वये

(श्री. व्ही.एस. सोयम)
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

संदर्भ क्र. संलग्नता टी-२/ 337
दिनांक- 2 JUL 2019

E:\Sm\Circular\Circular 2019.docx

PRO CENTRAL NOTICE BOARD

T2

महाराष्ट्र शासन

# अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह , कोल्हापूर

राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर
विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४

दुरध्वनी - (०२३१)२५३७८४० स्थापना २०१४ फॅक्स - (०२३१) २५३११८१
Web-site : www.rajacollkop.org Email ID –minoritygirlshostelkolhapur@gmail.com

जा.क्र.आस्था/अल्पसं/२०१९-२०२० / ४५४ दिनांक १४/०६/२०१९

Shivaji University, Kolhapur
Affiliation/T-2
Inward No. 1622
Date 25-6-19

24 JUN 2019
889

प्रति,

मा. प्राचार्य/कुलसचिव/संचालक,

**विषय: अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह, कोल्हापूर येथिल प्रवेशाबाबत...**

**संदर्भ: शासन निर्णय वसगृ - २०१२/प्रक्र.१६८/..८ मंत्रालय मुंबई दि. २१/०६/२०१३**

महोदय/महोदया,

वरील संदर्भाकीत विषयानुसार महाराष्ट्र शासनाने अल्पसंख्यांक प्रवर्गातील विद्यार्थीनीकरीता सर्व सोयींनी युक्त असे अद्ययावत मुलींकरीताचे वसतिगृह राजाराम महाविद्यालयाच्या परिसरात सुरु केलेले आहे. वसतिगृहामध्ये एकुण १०० मुलींच्या निवासाची सोय करण्यात आलेली आहे. त्यापेकी ७० जागा अल्पसंख्यांक मुलींकरीता (मुस्लिम - ३५, बौद्ध - २१, जैन - ६, शीख - १ व पारसी - १) तर ३० जागा ह्या बिगर अल्पसंख्यांक मुलींकरीता राखीव राहतील. वसतिगृहाच्या एका सत्राकरीता एकूण शुल्क रु. २८५०/- एवढे राहिल. परंतु **अल्पसंख्यांक प्रवर्गातील ज्या विद्यार्थीनींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ६,००,०००/- पेक्षा कमी आहे अशा विद्यार्थीनींचे प्रवेश शुल्क केवळ रु. ८००/- एवढे राहिल.**

वसतिगृहामध्ये प्रवेश घेण्याकरीता इच्छुक विद्यार्थिनींनी अल्पसंख्यांक विद्यार्थिनी वसतिगृहाच्या कार्यालयातून विहित नमुन्यातील प्रवेश अर्ज प्राप्त करुन घेवून त्यांनी प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयामार्फत प्राचार्यांचा सही व शिक्का घेऊन अर्ज वसतिगृहाच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये (सकाळी १०.३० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत) दि. १०/०७/ २०१९ पुर्वी जमा करावा. अधिक माहितीसाठी शासन निर्णय वसगृ - २०१२/प्रक्र.१६८/..८ मंत्रालय मुंबई दि. २१/०६/२०१३ व ०५/०९/२०१४ पहावा. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या (mdd.maharashtra.gov.in)उपलब्ध आहे. सदरची वसतिगृह प्रवेशाची बाब आपण आपल्या अधिपत्याखाली महाविद्यालयीन प्रवेश घेणा-या सर्व विद्यार्थीनींच्या निदर्शनास आणून द्यावी.

आपला विश्वासू,

सोबत: प्रवेश अर्ज

(डॉ. ए.एस.खेमनर)
अध्यक्ष
अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह,
प्राचार्य राजाराम महाविद्यालय कोल्हापूर(महाराष्ट्र शासन)

महाराष्ट्र शासन

अल्पसंख्याक मुलींचे वसतीगृह , कोल्हापूर

विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४

दुरध्वनी - (०२३१)२५२१८४४ स्थापना २०१४

Web-site : www.rajacollkop.org Email ID –minoritygirlshostelkolhapur@gmail.com

===

## विद्यार्थीनी वसतिगृह प्रवेश अर्ज

प्रति,

मा. अधिक्षक, विद्यार्थीनी वसतिगृह,

अल्पसंख्यांक मुलींचे वसतिगृह, कोल्हापूर

महोदय/महोदया,

मी सन २०१९-२०या शैक्षणिक वर्षाकरीता अल्पसंख्यांक वसतिगृहामध्ये प्रवेश मिळविण्याकरीता अर्ज करीत आहे. माझ्याबाबतची संपूर्ण माहीती खालीलप्रमाणे असून ती पूर्णपणे बरोबर आहे. अर्जासोबत जोडलेल्या वसतिगृह प्रवेश नियमावलीचे काटेकोरपणे पालन करीन. त्यांपैकी कोणत्याही नियमाचे उल्लंघन झाल्यास, माझ्यावर दंडात्मक कारवाई किंवा माझा प्रवेश रद्द होणार आहे. याची मला पूर्ण कल्पना आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | विद्यार्थीनीचे नाव | - |
| २ | जन्म तारीख | - |
| ३ | पत्रव्यवहाराचा पत्ता | - |
| ४ | स्वत:चा मोबाईल नंबर | - |
| ५ | प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयाचे नांव | - |
| ६ | प्रवेश घेतलेला वर्ग, दिनांक व प्रवेश पावती क्रमांक (छायांकित प्रत जोडावी) | - |
| ७ | वडीलांचा/ पालकांचा पत्रव्यवहाराचा पत्ता | - |
| ८ | पालकांचा व्यवसाय व उत्पन्न | - |
| ९ | वडीलांचा/पालकांचा मोबाईल नंबर | - |
| १० | प्रवर्ग (आवश्यक ते ठेवावे) | -अल्पसंख्यांक/ बिगर अल्पसंख्यांक |
| ११ | धर्म (अल्पसंख्यांक असल्यास पुरावा जोडावा) | - |
| १२ | गतवर्षी पास झालेला वर्ग व टक्केवारी (गुणपत्रिकेची छायांकित प्रत जोडावी) | - |

पालकांची सही- विद्यार्थीनीची सही-

---

### प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कुमारी/श्रीमती---------------------------विद्यार्थीनी------------------------ या महाविद्यालयात------------- या वर्गात शैक्षणिक वर्ष प्रवेश घेतलेला असून तीला अल्पसंख्यांक विद्यार्थीनी वसतिगृहामध्ये प्रवेश देण्यास या महाविद्यालयाची कोणतीही हरकत नाही.

स्थळ-

दिनांक- प्राचार्य सही व शिक्का

---

(वसतिगृह कार्यालयाकरीता)

शैक्षणिक वर्ष २०१९-२० या करीता प्रवेश देण्यास पात्र आहे/नाही.

प्रवेश शुल्क भरल्याची रक्कम रु. पावती क्र.- दिनांक

दिनांक-

स्थळ- कोल्हापूर

टिप- जात प्रमाणपत्रासाठी शाळा सोडल्याचा दाखला ग्राह्य धरण्यात येईल. तसेच अल्पसंख्यांक प्रवर्गातील ज्या विद्यार्थीनींच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ६,००,०००/- पेक्षा कमी आहे अशा विद्यार्थीनींचे निवास शुल्क माफ करण्यात येईल व उत्पनाचा पुरावा म्हणून पालाकांचा स्वत: १०० रुपयांच्या स्टॅप पेपरवर आपले वार्षीक उत्पन्न प्रमाणित केलेला दाखला ग्राह्य धरण्यात येईल.